# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या सदतिसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.११ नोव्हेंबर, २०११ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सदतिसावी सभा शुक्रवार, दि.११/११/२०११ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मंडळ | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ६) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ९) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| ११) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १२) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १३) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १४) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

प्रा. डॉ. पाटील टी. आर. व डॉ. कदम एस. डी. व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थिती कळविली त्याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] दि.३० सप्टेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव : दि.३० सप्टेंबर, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.

**[ २ ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव : महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरुमहोदयांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] सोलापूर विद्यापीठामध्ये रसायनशास्त्र विषय घेऊन एम.एस्सी. पदवी गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरीता श्री. केशव राजाराम जोशी यांनी १,००,०००/- (रू. एक लाख) देणगी दाखल सादर केलेल्या पत्राबाबत.**

(टिपणी: श्री. केशव राजाराम जोशी सोलापूर यांनी त्यांच्या पत्रात सोलापूर विद्यापीठात रसायनशास्त्राच्या पदव्युत्तर (एम.एस्सी.) अभ्यासक्रमात विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातून प्रथम क्रमांकाने पदवी प्राप्त करणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याचा मानस असून हे सुवर्णपदक "**केशव रा. जोशी सुवर्णपदक**" या नावाने विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभावेळी स्नातकास प्रदान करण्यात यावे. याकरिता श्री. केशव जोशी रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) देणगीदाखल देवू इच्छितात. सदरच्या रकमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील सुवर्णपदक देण्यात यावे. तथापि, सातव्या दीक्षांत समारंभात सदरचे सुवर्णपदक श्री. केशव जोशी यांनी स्वतः तयार करुन देण्याची खात्री दिलेली आहे. तसेच सदर सुवर्णपदकासाठी विद्यापीठाने योग्य ती नियमावली करण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

श्री. केशव राजाराम जोशी यांनी देणगी देण्याची बाब महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (एच) नुसार विचारार्थ).

**ठराव :** **अ) सोलापूर विद्यापीठामध्ये रसायनशास्त्र विषय घेऊन एम.एस्सी. पदवी परीक्षेमध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या स्नातकास सुवर्णपदक देण्याकरीता श्री. केशव राजाराम जोशी यांची १,००,०००/- (रू. एक लाख) देणगी स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**ब) सुवर्णपदकासाठी सर्वसमावेशक नियमावली करण्याकरीता प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. व ॲड. सलगर बी. एस. यांची समिती गठीत करण्यात आली.**

**[ ०४ ] ग्रंथालय समितीच्या दि.२१/०९/२०११ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

(टिपणी : ग्रंथालय समितीची दि.२१/०९/२०११ रोजी सभा झाली. विषय पत्रिकेवर पुस्तके व नियतकालिके खरेदी, वार्षिक खर्च व वार्षिक अहवाल इ. विषय विचारार्थ होते. ग्रंथालय समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (१) (c) (iii), (iv) व (v) अन्वये मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, ग्रंथालय समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव).

ठराव : **ग्रंथालय समितीच्या दि.२१/०९/२०११ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] वकीलांच्या पॅनेलची मुदत संपलेली असल्याने पुढील ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबतची बाब विचारार्थ.**

(टिपणी : दि.१८ ऑक्टोबर, २००८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. ६ वरील ठरावानुसार जिल्हा व सत्र न्यायालय येथील व उच्च न्यायालय मुंबई येथील कोर्टकेस कामाकरीता वकीलांचे पॅनेल तीन वर्षाकरिता तयार करण्यात आलेले होते. त्यानंतर वेळोवेळी गरजेप्रमाणे वकीलांच्या पॅनेलमध्ये वाढ करण्यात आली. त्यानुसार वकीलांचे सध्याचे पॅनेल खालीलप्रमाणे आहे.

अ) जिल्हा व सत्र न्यायालय येथील केसेस करीता वकीलांचे पॅनेल :

१) ॲड. श्री. व्ही. वाय. पांढरे

२) ॲड. श्री. व्ही. एस. आळंगे

३) ॲड. श्री. व्ही. एन. पाटील

४) ॲड. श्री. प्रकाश एस. जन्नू

५) ॲड. श्री. वेंकटेश आर. गुंडेली

६) ॲड. ए. डी. ठोकडे

७) ॲड. एस. व्ही. उजळंबे

ब) उच्च न्यायालय मुंबई येथील केसेस करीता वकीलांचे पॅनेल :

१) ॲड. श्री. प्रमोद एन. जोशी

२) ॲड. श्री. सचिन ढाकेफाळकर

३) ॲड. श्री. एस. डी. ठोकडे

४) ॲड. सचिन देशमुख - औरंगाबाद खंडपीठासाठी.

सबब, वकीलांच्या पॅनेलची मुदत संपलेली असून सदर पॅनलला पुढील ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : वकीलांच्या वरीलप्रमाणे पॅनेलला पुढील ३ वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] दि. ०४/११/२०११ रोजी झालेल्या बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी : बांधकाम समितीची सभा दि. ०४/११/२०११ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर समितीच्या कार्यवृत्तांतास परिनियम 339 (f) अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, दि. ०४/११/२०११ रोजीचा बांधकाम समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ)

| | | |
|---|---|---|
| **ठराव :** | **दि. ०४/११/२०११ रोजी झालेल्या बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | |
| | **बां.स. ठराव क्र. १ :** | **मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स. ठराव क्र. २ :** | **खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>"विद्यापीठ परिसराभोवती भूशास्त्र संकूल ते अतिथीगृहापर्यंत सुरक्षा भिंत बांधकाम करणे" या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.१८,२५,४२६/- या रकमेस मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स. ठराव क्र. ३ :** | **शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स. ठराव क्र. ४:** | **शिफारस स्वीकारण्यात येवून खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>"विद्यापीठ परिसरात रसायनशास्त्र संकूल परिसरात जमिनीखाली टाकी बांधणे" या कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,५१,८१२/- या रकमेस मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स. ठराव क्र. ५:** | **शिफारस स्वीकारुन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स. ठराव क्र. ६:** | **शिफारस स्वीकारुन मान्यता देण्यात आली.** |
| | **बां.स. ठराव क्र. ७(१):** | **शिफारस स्वीकारुन मान्यता देण्यात आली.** |

**[ ०७ ] व्हिजन २०२० समितीने तयार करुन दिलेला विद्यापीठाचा व्हिजन २०२० अहवाल विचारार्थ.**

[टिपणी :- मा.कुलपती कार्यालय व शासननिर्णयान्वये वेळोवेळी सूचित केल्याप्रमाणे मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापीठाचे व्हिजन २०२० तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत केली होती.

१.प्राचार्य डॉ.जगताप एच.एन, अध्यक्ष २.प्रा.बी.पी.रोंगे, सदस्य
३.प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर, सदस्य ४.शदर ठाकरे, सदस्य
५.श्री.बाबूराव गायकवाड, सदस्य ६.श्री.इगा पुरुषोत्तम, सदस्य

व्हिजन २०२० च्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे सर्व शैक्षणिक संकुलांना, संलग्नित महाविद्यालयांना व प्रशासकिय विभागांना पत्राव्दारे व्हिजन २०२० तयार करुन कार्यालयाकडे पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालयांकडून, शैक्षणिक संकुलांकडून व प्रशासकिय विभागाकंडून व्हिजन २०२० बाबतची माहिती प्राप्त झाली होती. सर्व प्राप्त झालेली माहितीबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मा.प्राचार्य डॉ.एच.एन जगताप, अध्यक्ष, व्हिजन २०२० समिती यांच्या सूचनेनुसार विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकित प्राप्त माहितीचे विश्लेषण करुनअहवाल सादर करण्यासाठी खालील उपसमित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

**संलग्नित महाविद्यालये -**

१. प्रा.डॉ.अंधारे एस.जी, अध्यक्ष, २.डॉ.व्ही.बी.घुटे, सदस्य ३.डॉ.भानुमते सी.एस, सदस्य
४.प्रा.डॉ.आर.बी.भोसले, सदस्य

**विद्यापीठ अंतर्गत शैक्षणिक संकुले**

१. प्रा.डॉ.लोणीकर एस.व्ही, अध्यक्ष, २.प्रा.डॉ.आर.आर.पाटील, सदस्य
३.प्रा.अशोककुमार ई.एन, सदस्य ४.श्री.मेंते आर.एस, सदस्य

**विद्यापीठ प्रशासकीय विभाग**

१.प्रा.डॉ.मालदार एम.एम, अध्यक्ष २. प्रा.डॉ.एल.पी.देशमुख, सदस्य

उपरोक्त समिती सदस्यांकडे संलग्नित महाविद्यालये, प्रशासकीय विभाग, शैक्षणिक संकुले यांच्याकडून व्हिजन २०२० बाबतची प्राप्त झालेली माहिती अहवाल तयार करण्यास्तव वर्ग करण्यात आली. उपरोक्त प्रमाणे नियुक्त केलेल्या समिती सदस्यांनी माहितीचे विश्लेषण करुन अहवाल या कार्यालयाकडे सादर केला होता. दरम्यानच्या काळात व्हिजन २०२० समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.जगताप एच.एन हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्याऐवजी प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर यांची व्हिजन २०२० समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. उपरोक्त समित्यांनी सादर केलला अहवाल समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर यांच्याकडे विद्यापीठाचे व्हिजन २०२० तयार करण्यास्तव देण्यात आला आहे. समितीच्या अध्यक्षांनी संलग्नित महाविद्यालयांचा व्हिजन २०२० चा अहवाल, प्रशासकीय विभागांचा अहवाल व शैक्षणिक संकुलांचा अहवाल अवलोकनी घेवून विद्यापीठाचे सोबत जोडल्याप्रमाणे व्हिजन २०२० तयार करुन कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर केलेला आहे.

प्राप्त अहवाल मा.संचालक सर्व शैक्षणिक संकुले, सोविसो यांच्याकडे अभिप्राय व अधिकच्या सूचना असल्यास त्या कळविण्यास्तव पाठविण्यात आला होता. त्याआषुंगाने शैक्षणिक संकुलांकडून अभिप्राय / सूचना प्राप्त झालेल्या आहेत.प्राप्त सूचना मा.अध्यक्ष, व्हिजन २०२० यांच्या निदर्शनास आणून त्यांच्या सूचानुसार व्हिजन २०२० अहवालात समाविष्ट केलेला आहे.

सबब प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर, अध्यक्ष व्हिजन २०२० डॉक्युमेंट यांच्याकडून प्राप्त झालेला व्हिजन २०२० अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : व्हिजन २०२० समितीने तयार करुन दिलेल्या विद्यापीठाच्या व्हिजन २०२० अहवालामध्ये काही दुरुस्त्या / सूचना सुचवावयाच्या त्या दुरुस्तीसह सादर करण्यात यावा असे ठरले.**

**[ ०८ ]	सन २००९-१० च्या वार्षिक मराठी अहवालाबाबत मा.कुलगुरू यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १०४ नुसार, सोलापूर विद्यापीठाचा सन २००९-२०१० चा वार्षिक मराठी अहवाल तयार करण्यात आला असून सदर अहवालाच्या एकूण १२०० प्रती छपाई करण्यासाठी दि.०६/१०/२०१० रोजीच्या दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रातून जाहीर निविदा प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार एकूण ३ मुद्रणालयाकडून निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त निविदांच्या तुलनाात्मक तक्त्यानुसार (सोबत जोडल्यानुसार) न्यूनतम दर असलेली मे.अनिल प्रिटींग प्रेस सोलापूर यांच्याशी वाटाघाटी केल्यानंतर मे.अनिल प्रिटीग प्रेस सोलापूर यांनी प्रति नग रू.९२/- प्रमाणे छपाई करून देण्याची तयारी दर्शविली आहे. एकूण १२०० प्रती छपाई करून घ्यावयाच्या असून याकरिता रू.१,१०,४००/- (अक्षरी रू.एक लाख दहा हजार चारशे फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे.

वार्षिक अहवाल छपाई ही खरेदी नसून सेवा आहे. याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२१ जुलै २०११ रोजीच्या सभेतील विषय क्र.२१ वरील ठरावानुसार, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ठेवणे आवश्यक होते. परंतू नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची सभा होणार नसल्याने व सदरचा वार्षिक अहवाल अधिसभेसमोर ठेवायचा असल्याने तातडीची गरज लक्षात घेता, मा.कुलगुरू यांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम १४(७) अन्वये, व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सबब मा.कुलगुरू यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव :	मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०९ ] सोलापूर विद्यापीठाचा सन २००९-१० चा ६ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणीः सोलापूर विद्यापीठाचा सन २००९-१० चा ६ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.३०/०९/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. ७ अन्वये सादर करण्यात आला होता.

सदरचा सन २००९-१० चा ६ वा वार्षिक अहवाल अधिसभेच्या दि.०९/१२/२०११ रोजीच्या सभेत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सदरचा वार्षिक अहवाल अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठाचा सन २००९-१० चा ६ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ १० ] सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालाबाबत मा.कुलगुरुंनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (२) (सी सी) नुसार सन २००९-१० चे झालेले वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर दि.२८/०२/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. १८ अन्वये सादर केला असता त्यावर झालेला ठराव खालीलप्रमाणे आहे.

"सन २००९-२०१० च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात आली व अधिसभेस हा लेखापरीक्षण अहवाल मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. "

यानंतर सदरचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या दि.०३/०४/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. ०३ अन्वये सादर केला असता, सदरचा प्रस्ताव तांत्रिक कारणास्तव मागे घेण्यात आला.

अधिसभेच्या ठरावाच्या अनुषंगाने सदर वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल याबाबतची माहिती व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे. मा.कुलगुरुमहोदय यांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदरचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल वित्त व लेखा समितीसमोर पुनश्चः विचारार्थ करण्याबाबत मान्यता दिलेली आहे.

सबब, मा.कुलगुरुमहोदय यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ११ ] दि.०३/११/२०११ च्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

(टिपणी : दि.०३/११/२०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब दि.०३/११/२०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : दि.२८/०२/२०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र. १८ अन्वये त्रुटी दुरुस्त करुन दि.०३/११/२०११ च्या वित्त व लेखा समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास मान्यता देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| **ठराव :** | **दि.०३/११/२०११ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.** | |
| | **वि. व ले. स. ठराव क्र. १ :** | **मान्यता देण्यात आली.** |
| | **वि. व ले. स. ठराव क्र. २ :** | **शिफारस स्वीकारण्यात येवून अधिसभेस शिफारस करण्यात आली.** |
| | **वि. व ले. स. ठराव क्र. ३(१):** | **शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| | **वि. व ले. स. ठराव क्र. ३(२) :** | **शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**[ १२ ] सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणीः सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/०२/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. १५ अन्वये व अधिसभेच्या दि.०३/०४/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. ३ अन्वये सादर करण्यात आले होते.

तांत्रिक कारणास्तव अधिसभेच्या दि.०३/०४/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. ३ बाबत व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. ए. बी. सूर्यवंशी यांनी मांडलेला प्रस्ताव मागे घेण्यात आला.

सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या दि.०९/१२/२०११ रोजीच्या सभेत पुनश्च सादर करण्यात येणार आहेत.

सबब, सदरचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या सभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव : सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :**

**( १३(१)) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ०८ नोव्हेंबर, २०११ रोजीचे गट क व गट ड च्या भरतीप्रक्रियेस परवानगी दिल्याच्या पत्राप्रमाणे दि.०८/०३/२०१० च्या जाहिरातीनुसार भरती प्रक्रिया करण्याबाबत विचारार्थ.**

(टिपणी : विद्यापीठामध्ये गट क व गट ड संवर्गातील भरतीप्रक्रिया सुरु करण्यात आलेली होती. दि.३० जून, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सदरच्या भरतीप्रक्रियेवर एक वर्षाच्या कालावधीकरीता निर्बंध घातलेले होते व एक वर्षानंतर हे निर्बंध उठविण्यात आल्याचे समजण्यात यावे असेही नमूद करण्यात आले होते.

गट क व गट ड संवर्गातील भरतीसंदर्भात दि. ०१/०८/२०११ रोजी मा. प्रधान सचिव (सेवा) यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत सोलापूर विद्यापीठास भरती प्रक्रिया सुरु करण्यास परवानगी देण्यात आली. दि.०८ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या पत्रान्वये, विद्यापीठाने त्वरित भरतीप्रक्रिया सुरु करावी असे कळविण्यात आलेले आहे त्यानुसार जाहिरात क्र. सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८/०३/२०१० रोजीची जाहिरात कायम ठेवून त्यास अनुसरुन प्राप्त अर्जानुसार, लेखी परीक्षेस पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा घेऊन पुढील प्रक्रिया सुरु करण्याबाबत विचारार्थ).

**ठराव :**

**अ) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ०८ नोव्हेंबर, २०११ रोजीचे गट क व गट ड च्या भरतीप्रक्रियेस परवानगी दिल्याच्या पत्राची नोंद घेण्यात आली.**

**ब) दि.०८/०३/२०१० रोजीची जाहिरात कायम ठेवून त्यास अनुसरुन प्राप्त अर्जानुसार पुढील प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात आली.**

**( १३ (२)) विद्यापीठाकडील वर्ग ०३ व ०४ मधील शिपाई पदाच्या लेखी परीक्षेमधून पात्र होणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी १:१० प्रमाणे बोलविण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : वर्ग ०३ व ०४ च्या प्रशासकीय पदांसाठी सरळसेवेने नियुक्ती करण्यासाठी विद्यापीठ जाहिरात क्र.सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८/०३/२०११ नुसार प्राप्त अर्जाची दि.०५/०६/२०१० रोजी छाननी केलेली समितीने शिफारस केलेली आहे त्यास व्यवस्थापन परिषदेने दि. २१/०७/२०११ रोजीच्या ठराव क्र. ०५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

छाननी समितीने दि.०५/०६/२०१० रोजी सादर केलेल्या अहवालामध्ये अ.क्र.०७ मध्ये शिपाई या पदासाठी खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

| अ.क्र | पद व लेखी परीक्षेचे स्वरुप | तपशिल |
|---|---|---|
| ७) | ०१. शिपाई<br>(इयत्ता सातवी पातळीवरील परीक्षा) | १. लेखी परीक्षा - ७५ गुणंची १:३०(दीड) तासाची बहुपर्यायी लेखी परीक्षा होईल, त्यामध्ये मराठी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांचा समावेश असेल. या परीक्षेत ४५ % गुण मिळालेल्या उमेदवारानांच मुलाखत देता येईल.<br>२. मुलाखत - २५ गुणांची राहील. |

यामध्ये किती उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावावे याचे गुणोत्तर नाही तेव्हा इतर पदांप्रमाणे गुणानुक्रमे संवर्गनिहाय गुणवत्ता यादीनुसार जास्तीत जास्त १:१० याप्रमाणे उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्याबाबत विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठाकडील वर्ग ०३ व ०४ मधील शिपाई पदाच्या भरतीच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सुधारीत मान्यता देण्यात आली.**

| **अ.क्र.** | **पद व लेखी परीक्षेचे स्वरुप** | **तपशिल** |
|---|---|---|
| **७)** | **०१. शिपाई<br>(इयत्ता सातवी पातळीवरील परीक्षा)** | **१) लेखी परीक्षा - ७५ गुणंची १:३०(दीड) तासाची बहुपर्यायी लेखी परीक्षा होईल, त्यामध्ये मराठी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांचा समावेश असेल.<br>२) लेखी परीक्षेत किमान ४५% गुण मिळालेल्या उमेदवारानांच मुलाखत देता येईल. परंतू गुणानुक्रमे संवर्गनिहाय गुणवत्ता यादीनुसार जास्तीत जास्त १:१० या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे.<br>३) मुलाखत - २५ गुणांची राहील.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**